# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४

जुलै-ऑगस्ट २०२२ मध्ये घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) पुरवणी परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने सादर करावयाच्या तारखांबाबत........

## प्रकटन

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे ) Transfer of Credit घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यासाठी सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने **www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर नियमित शुल्कासह सादर करावयाच्या तारखांना मुदतवाढ देण्यात येत आहे, त्याचा तसेच विलंब शुल्काच्या कालावधीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| शुल्क प्रकार | विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळांमार्फत पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणीप्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (परीक्षेस प्रविष्ट न झालेले ), श्रेणीसुधार व तुरळक विषय घेवून प्रविष्ठ होणारे, ITI (औद्योगिक प्रशिक्षण संस्थेव्दारे Transfer of Credit घेणारे विद्यार्थी)ऑनलाईन पध्दतीने आवेदनपत्रे भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी बँकेत चलनाद्वारे शुल्क भरावयाच्या तारखा | माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या जमा करावयाची तारीख |
|---|---|---|---|
| नियमित शुल्क | मंगळवार, दिनांक २८/०६/२०२२ ते गुरुवार , दिनांक ३०/०६/२०२२ | मंगळवार , दिनांक ०५/०७/२०२२ ते बुधवार, दिनांक ०६/०७/२०२२ | गुरुवार दिनांक ०७ /०७/२०२२ |
| विलंब शुल्क | शुक्रवार , दिनांक ०१/०७/२०२२ ते सोमवार, दिनांक ०४/०७/२०२२ | | |

दिनांक २०/०६/२०२२ ते २७/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने आवेदनपत्रे सादर करावयाच्या तारखा यापूर्वी निश्चित करण्यात आलेल्या होत्या. परंतु विद्यार्थी हित लक्षात घेता आवेदनपत्रे दि.२८/०६/२०२२ ते दि.३०/०६/२०२२ पर्यंत नियमित शुल्काने व दि.०१/०७/२०२२ ते दि.०४/०७/२०२२ पर्यंत विलंब शुल्काने सादर करण्यास मुदत देण्यात येत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे नियमित व विलंब शुल्कासह आवेदनपत्रे सादर करण्याच्या तारखा निश्चित करण्यात येत आहेत. मात्र तद्नंतर आवेदनपत्रे नियमित शुल्काने सादर करावयाच्या तारखांमध्ये कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ देण्यात येणार नाही. तसेच या संदर्भात काही अडचणी असल्यास संबंधित विभागीय मंडळाशी संपर्क साधावा.

दि.२४/०६/२०२२

(डॉ अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४